**ठळक बातम्या**

- देशातल्या पहिल्या शयनयान वंदे भारत गाडीला प्रधानमंत्र्यांच्या उपस्थितीत सुरुवात

- मुंबईत पोलिसांसाठी ४५ हजार घरं बांधण्याचा राज्य सरकारचा निर्णय

- गाझा संघर्ष संपुष्टात आणण्यासाठी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याकडून नव्या शांतता मंडळाची घोषणा

**आणि**

- महिलांच्या क्रिकेट प्रीमियर लीगमध्ये रॉयल चॅलेंजर बंगळुरू विरुद्धच्या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सची अडखळत सुरुवात

<><><><><>

देशातल्या पहिल्या वंदे भारत शयनयान गाडीला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज मालदा रेल्वे स्थानकातून दुरदृश्य प्रणालीद्वारे हिरवा झेंडा दाखवला. हावडा आणि गुवाहाटी दरम्यान ही गाडी धावणार आहे. शयनयान वंदे भारत रेल्वे पूर्णपणे वातानुकूलित असून प्रवाशांना परवडणाऱ्या दरात सेवा देणार आहे.एकूण ८२३ प्रवाशांची क्षमता असलेल्या या रेल्वेत १६ आधुनिक कोच आहेत. याप्रसंगी प्रधानमंत्री म्हणाले…

**होल्ड… बाईट - प्रधानमंत्री**

त्याबरोबरच चार आधुनिक अमृत भारत एक्सप्रेस रेल्वेगाड्यांनाही प्रधानमंत्र्यांनी हिरवा झेंडा दाखवला. यात अलीपूरद्वार - पनवेल गाडीचाही समावेश आहे. यावेळी त्यांनी पश्चिम बंगाल आणि ईशान्य भारतात विकासकामांना वेग देणाऱ्या ३ हजार २५० कोटी रुपये खर्चाच्या विविध रस्ते आणि रेल्वे पायाभूत प्रकल्पांचं आज उद्घाटन केलं.

यानंतर पश्चिम बंगालच्या मालदामध्ये झालेल्या रॅलीमध्ये त्यांनी तृणमूल काँग्रेस सरकारवर टीका केली. आयुष्मान भारत, पी एम सूर्य घर मोफत वीज योजना आणि जल जीवन मिशन यासारख्या केंद्राच्या कल्याणकारी योजना राबवण्यात पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी अडथळे आणत असल्याचा आरोप त्यांनी केला. पश्चिम बंगालमध्ये होत असलेली बेकायदेशीर घुसखोरी ही राज्यासमोरची गंभीर समस्या असून राजकीय कारणांमुळे तृणमूल काँग्रेस सरकार या समस्येवर मात करण्यात अपयशी ठरल्याचं ते म्हणाले. संध्याकाळी त्यांनी आसाममध्ये गौहत्ती विमानतळ ते आझरा पर्यंत रोड शो केला. त्यानंतर ते गौहत्तीमधल्या बागुरुंबा दुहो 2026 या पारंपारीक सोहळ्यात सहभागी झाले.

<><><><><>

मुंबई शहर आणि उपनगरातल्या पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी राज्य सरकार आता ४० ते ४५ हजार घरं बांधणार आहे. यासाठीच्या मुंबई पोलीस गृहप्रकल्पाला आज मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून हा प्रकल्प उभारण्यात येईल. पाच कोटी चौरसफूट क्षेत्रफळात हा प्रकल्प तयार होणार असून त्याला अंदाजे २० हजार कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे.

जगभरातील विविध देशातल्या रोजगारासंबंधी समन्वय आणि अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र व्यापक आंतरराष्ट्रीय गतिशीलता आणि क्षमता संस्था -MAHIMA या संस्थेची स्थापना करायलाही सरकारनं मंजुरी दिली. या संस्थेच्या माध्यमातून महाराष्ट्रातील तरूणांना विविध देशातील रोजगार उपलब्धता आणि संधी यांची माहिती उपलब्ध करून दिली जाणार आहे.

मुंबई आणि नवी मुंबईला जोडणाऱ्या शिवडी न्हावाशेवा अटल सेतूवरच्या टोलशुल्कात पन्नास टक्के सवलत आणखी वर्षभर कायम ठेवण्याचा निर्णय कायम आजच्या बैठकीत झाला. इलेक्ट्रिक मोटार, बस यांनाही अटल सेतूवर

टोलशुल्कातून पूर्ण सूट मिळेल. मुंबई नागरी परिवहन प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यासाठी सुधारित वित्तीय आराखड्यालाही आजच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली.

<><><><><>

मुंबईत बहुमताचा आकडा पार करण्यात अपयश आलं असली तरी मुंबईच्या महापौरपदावरची आशा माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सोडलेली नाही. देवाची इच्छा असेल तर मुंबईत आपला महापौर होईल, असं वक्तव्य त्यांनी मुंबईत नव्यानं निवडून आलेल्या नगरसेवकांशी बोलताना केलं.

**होल्ड - उद्धव बाइट**

एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या मुंबईतल्या नगरसेवकांना वांद्र्यातल्या हॉटेलमध्ये ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. मुंबईचं महापौरपद अडीच-अडीच वर्षांसाठी वाटून देण्याची मागणी शिंदे यांच्या काही नेत्यांनी भाजपाकडे केल्याचं वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे.

मुंबईत भाजपाला जेवढ्या जागा मिळाल्या आहेत, तेवढ्या शिवसेनेला गेल्या तीन निवडणुकांमध्येही मिळाल्या नव्हत्या. आता मुंबईचा महापौर कोण होणार हे शिवसेनेसोबत बसून ठरवणार आहोत, त्यात काहीही वाद नाहीत, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यात वार्ताहरांशी बोलताना स्पष्ट केलं. मुंबईला जगातलं सर्वोत्तम शहर म्हणून प्रस्थापित करायचं भाजपाचं ध्येय आहे. एकही मराठी माणूस मुंबईबाहेर जाणार नाही, गरीबांना घर देण्याचं धोरण भाजपा राबवणार असल्याचं ते म्हणाले.

**होल्ड - मुख्यमंत्री बाइट**

<><><><><>

स्थावर मालमत्ता गैरव्यवहार प्रकरणी सक्तवसुली संचालनालयानं एका कंपनीविरोधात भिवंडी, फरीदाबाद आणि पलवल भागात शोधमोहिमा राबवल्या. या

मोहिमांदरम्यान काही कागदपत्रं, रोख रक्कम, दागिने इत्यादी मिळून ५ कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

<><><><><>

गाझा संघर्ष संपुष्टात आणण्यासाठीच्या २० कलमी शांतता योजनेच्या दुसऱ्या टप्प्याची अंमलबजावणी करण्याच्या उद्देशानं, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी शांतता मंडळाच्या सदस्यांची घोषणा केली आहे. हे मंडळ गाझामधील प्रशासन, प्रादेशिक सहकार्य, पुनर्बांधणी, गुंतवणूक आणि दीर्घकालीन स्थैर्य राखण्यासाठी प्रयत्न करेल.

ट्रम्प हे स्वतः या मंडळाचे अध्यक्ष असतील. त्यांच्याशिवाय अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबिओ, ब्रिटनचे माजी पंतप्रधान टोनी ब्लेअर, ट्रम्प यांचे विशेष दूत स्टीव्ह विटकॉफ, जागतिक बँकेचे अध्यक्ष अजय बंगा, ट्रम्प यांचे जावई जेरेड कुशनर, अपोलो ग्लोबल मॅनेजमेंटचे मुख्य कार्यकारी अधिकारी मार्क रोवन आणि अमेरिकेचे उप राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार रॉबर्ट गॅब्रिएल यांचा या मंडळात समावेश केला गेला आहे.

दरम्यान, अनेक मानवाधिकार तज्ज्ञांनी या मंडळाच्या रचनेवर टीका केली असून, एखाद्या परकीय भूभागाच्या प्रशासनावर देखरेख ठेवणारी ही रचना वसाहतवादी मानसिकतेची असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

अमेरिकेचे भारतातले राजदूत सर्जिओ गोर यांनी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुंबईत भेट घेतली. महाराष्ट्र आणि अमेरिका यांच्यातले व्यापार, गुंतवणूक, मनोरंजन, तंत्रज्ञान, उत्पादन, ऊर्जा आणि आरोग्य इत्यादी क्षेत्रांमधले द्विपक्षीय संबंध कसे आणखी बळकट करता येतील, यावर या भेटीत चर्चा झाल्याचं मुख्यमंत्र्यांनी आणि राजदूत गोर यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

तसंच गोर यांनी रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांचीही भेट घेतली आणि अमेरिकेतलं अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि परस्पर सहकार्यावर चर्चा केली.

<><><><><>

युगांडाच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत योवेरी मुसेवेनी यांनी सातव्यांदा विजय मिळवला आहे. त्यांना ७१ टक्क्यांपेक्षा अधिक मत मिळाली आहेत. विरोधी पक्षनेते बोबी वाईन यांचा त्यांनी पराभव केला. ही निवडणूक प्रक्रीया निष्पक्ष झाली नसल्याचा आरोप वाईन यांनी केला आहे.

<><><><><>

मध्य प्रदेशातल्या भोपाळ वायू दुर्घटनेतील मृतांच्या स्मरणार्थ युनियन कार्बाइड कारखान्याच्या जागी  स्मारक उभारण्याची घोषणा, मध्यप्रदेशाचे मुख्यमंत्री मोहन यादव यांनी केली आहे. या कारखान्याच्या परिसरातला घातक कचरा, पर्यावरणाचं कोणतंही नुकसान न करता सुरक्षितपणे नष्ट करण्यात सरकारला यश आलं आहे असं त्यांनी सांगितलं. हे स्मारक उभारताना समाजातील सर्व घटकांना विश्वासात घेतलं जाईल, तसंच उच्च न्यायालयाच्या मार्गदर्शनाखाली कार्यवाही केली जाईल असं ते म्हणाले.

<><><><><>

महिला प्रिमियर क्रिकेट लीगमध्ये आजचा दुसरा सामना दिल्ली कॅपिटल्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यात सुरू आहे. बंगळुरूनं नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला आहे. दिल्लीच्या संघाची सुरुवात अडखळत झाली आहे. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा दिल्ली कॅपिटल्सच्या ८व्या षटकांत ५ बाद ६९ धावा झाल्या होत्या.

तत्पूर्वी, आजच्या पहिल्या सामन्यात यूपी वॉरियर्सनं मुंबई इंडियन्सनं वर २२ धावांनी विजय मिळवला.

//<><><><><>//